Reg. No. NP CITY/236/2018-2020.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक २७] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर २-८,२०२१/भाद्रपद ११-१७, शके १९४३ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२२.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ ऑगस्ट २०२१.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ :—**

क्रमांक टिपीएस-४११७-१६८९-प्र.क्र.-१३२-नवि-३०-२०१७.—

ज्याअर्थी, मालेगाव शहराची सुधारित विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे " उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. २५८६-स.क्र. ३१-१०९-नवि-१, दिनांक ४ सप्टेंबर १९८६ अन्वये मंजूर केली असून ती दिनांक ३१ ऑक्टोबर १९८७ पासून अंमलात आली आहे. (यापुढे " उक्त विकास योजना " असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे मालेगाव, गट क्र. १९५ मधील क्षेत्र ०.९६ हे. आर (यापुढे " उक्त जागा " असे संबोधले आहे) जागा " आ. क्र. ५ खेळाचे मैदान " या प्रयोजनासाठी आरक्षित आहे (यापुढे " उक्त आरक्षण " असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठाने, जनहित याचिका क्र. १७७/२०१६ मध्ये दिनांक ०७-०६-२०१७ च्या आदेशान्वये उक्त जमीन उक्त आरक्षणामधून वगळून " दिवाणी व फौजदारी न्यायालयाची इमारत व न्यायाधीशांचे निवासस्थान " या करीता आरक्षित करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे आणि जमीन वितरणाची प्रक्रिया शक्यतोवर चार महिन्यात पूर्ण करण्याबाबत शासनास आदेशित केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, मालेगाव नगरपंचायतीने उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१) मध्ये दिलेली वैधानिक पद्धती अनुसरून दिनांक २४-०९-२०१७ रोजीच्या पत्रान्वये उक्त विकास योजनेतील उक्त जमीन उक्त आरक्षणातून वगळून दिवाणी व फौजदारी न्यायालयाची इमारत व न्यायाधीशांचे निवासस्थान या करीता आरक्षित करणेबाबतचा फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी सादर केलेला आहे. (यापुढे " प्रस्तावित फेरबदल " असे संबोधले आहे) ;



अ.-एक-अ-१ (१५९९).

आणि ज्याअर्थी, क्रीडांगणाचे आरक्षणात फेरबदल करावयाची झाल्यास त्यासाठी मा. मंत्रिमंडळाची विवक्षित मान्यता घेण्यात यावी, असे निदेश उक्त अधिनियमाचे कलम १५४(१) अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिका व नगर परिषदांना शासनाने पत्र क्रमांक टिपीबी-४३२००१-२४४२-प्र.क्र.२६०-२००१-नवि-११, दिनांक २९-०८-२००३ अन्वये दिलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित फेरबदल प्रस्ताव दिनांक १५-०१-२०२० राजी आयोजित मा. मंत्रीमंडळासमोर सादर करण्यात आला असता त्यावर मा. मंत्रिमंडळाने खालील सूचना दिल्या :–

(१) " क्रिडांगण " असे आरक्षण असलेल्या जागेवर न्यायालयीन प्रयोजनाकरीता " दिवाणी व फौजदारी न्यायालयाची इमारत व न्यायाधीश निवासस्थान " असा आरक्षण बदल करण्यापूर्वी अन्य पर्याय जागेची उपलब्धता पहावी.

(२) पर्यायी जागा उपलब्ध नसल्यास क्रीडांगणासाठी आरक्षित जागे एवढ्या क्षेत्रफळाची अन्य पर्यायी जागा उपलब्ध करुन देता येईल किंवा कसे ? याबाबत तपासणी करावी.

आणि ज्याअर्थी, मत्रिमंडळाच्या उपरोक्त सूचनांच्या अनुषंगाने " दिवाणी व फौजदारी न्यायालयीन इमारत व न्यायाधीश निवासस्थान " या प्रयोजनासाठी पर्यायी जागा वितरीत करण्याची कार्यवाही महसूल विभागाकडे सुरु आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती विचारात घेऊन आणि आवश्यक ती चौकशी केल्यानंतर आणि संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर उक्त फेरबदलाचा प्रस्ताव नामंजूर करावा, असे शासनाचे मत झाले आहे ;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोट-कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून शासन, उक्त विकास योजनेतील उक्त फेरबदल प्रस्ताव नामंजूर करीत आहे.

सदरची अधिसूचना नागरिकांच्या अवलोकनार्थ मुख्याधिकारी, मालेगाव नगर परिषद, मालेगाव, यांचे कार्यालयात, कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी उपलब्ध करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**वीणा मोरे,**
अवर सचिव.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२३.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, Dated 26th August 2021.

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966 :—

No. TPS-4117/1689/CR-132/UD-30-2017.—

Whereas, the Development Plan of Malegaon City, Dist.-Washim has been sanctioned by the Government under Section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as " the said Act ") *vide* Notification No. 2586/CR-31-109/UD-01, dated 4th September 1986 and has come into force with effect from dated 31st October 1987 (hereinafter referred to as "the said Development Plan") ;

And whereas, according to the proposals of the said Development Plan, area admeasuring 0.96 Ha. in land bearing Gut No. 195 of City Malegaon (hereinafter referred to as "the said land") is reserved as "Site No. 5 -Play Ground" (hereinafter referred to as "the said reservation") ;

And whereas,Order dated 07-06-2017 in PIL No. 177 of 2016 passed by the Hon'ble High Court of Judicature at Nagpur Bench, has stated that the appopriate steps in terms of Section 37 of the said Act will be required to be taken by the Government to delete the said land from the said reservation and reserve the same for "Civil & Criminal Court, Building and Residence of Judge", and necessary steps as per the law are required to be taken by the Government to complete the process of allotment, if possible within a period of four month.

And whereas, as per the provisions of Section 37(*1*) of the said Act the Municipal Council, Malegaon *vide* its letter dated 25-09-2017, has submitted the proposal to the Government for sanction, so as to delete the said land from the said reservation, and to reserve the same for "Civil & Criminal Court Building and Residentce of Judge" (hereinafter referred to as " the Proposed Modification ") ;

And whereas, Government *vide* direction U/s 154 *(1)* of the said Act, bearing No. 432001-2442-C.R.260-2001-UD-11, dated 29-08-2003, has directed to all the Corporations and Municipal Council, to obtain sanction of the Hon'ble Cabinet for modification of reservation of playground.

And whereas, the proposed modification proposal was submitted to the Hon'ble Cabinet on dated 15-01-2020.

And whereas, as the Hon'ble Cabinet made following suggestions :–

(1) Before sanctioning the proposed modification, to check if the alternate land is available.

(2) If alternate land is not available, to check whether it is possible to allot alternate land for play ground having same area as of the said reservation.

And whereas, as the process of allotment of alternate land for the purpose of "Civil & Criminal Court, Building and Residence of Judge" is being carried out by the Revenue Department.

And whereas, considering the above situation and after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, the Government is of the opinion that the said modification needs to be rejected ;

Now, therefore, in exercise of powers conferred by sub-section (*2*) of Section 37 of the said Act, the Government of Maharashtra hereby refuses to accord sanction to the said Modification.

This Notification shall be kept open for inspection by the general public during office hours in the office of the Chief Officer, Malegaon Municipal Council, Malegoan.

This Notification shall also be published on the Govt. website *www.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VEENA MORE,
Under Secretary.

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिद्ध झालेली आहे.**

**१**

**सोमवार, ऑगस्ट ३०, २०२१/भाद्रपद ८, शके १९४३**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २६.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**आदेश**

क्रमांक १८२५-नविशा-कक्ष-२-२०२१.—

महाराष्ट्र नगर परिषदा आणि नगर पंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१-अ, पोट-कलम (४) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मी, एस. रामामुर्ती (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी, बुलडाणा या प्रगटनाद्वारे असे जाहीर करतो की, बुलडाणा जिल्ह्यातील नगर परिषद, सिंदखेडराजा या नगर परिषदेच्या उपाध्यक्ष पदाची निवडणूक दिनांक १०-८-२०२१ रोजी घेण्यात आली. सदर निवडणुकीमध्ये खालील अनुसूचित नमूद केलेल्या उमेदवाराची उपाध्यक्ष, नगर परिषद, सिंदखेडराजा म्हणून निवड झाली आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | नगर परिषदेचे नाव | निवडून आलेल्या उमेदवाराचे नाव | पद |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | सिंदखेडराजा, जि. बुलडाणा | तायडे रुखमन राधाजी | उपाध्यक्ष |

**एस. रामामूर्ती** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी,
बुलडाणा.

बुलडाणा :
दिनांक २६ ऑगस्ट २०२१.

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २७.

BY COLLECTOR

*ORDER*

No. 1825-NVS-Desk-2-2021.—

As required under Rule 51-A, sub-section (*4*) of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965. I, S. Ramamoorthy (IAS), Collector, Buldhana hereby publish the name of candidate who has been declared elected as Vice-President of the Nagar Parishad, Sindkhedraja in the election held on dated 10-08-2021.

SCHEDULE

| Sr. No. | Name of Municipal | Name of the Council | Elected as Elected |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | Sindkhedraja, Dist. Buldhana | Tayade Rukhman Radhaji | Vice-President |

S. RAMAMOORTHY (I.A.S.),
Collector,
Buldhana.

Buldhana :
Dated the 26th August 2021.

अ.-एक-अ-२ (१५९९).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.